# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १८२ वा शनिवार दि. १६ डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com


## आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्षांना मुदतवाढ मिळाली, १० जानेवारीपर्यंत निकाल दिला नाही तर पुढे काय होऊ शकतं?

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात (ड्ढळ्र्ीं ड्डशपर चड– उ्रीींरिश्रळषळलरींळेप उरीश) निकाल देण्यासाठी १० जानेवारीपर्यंतची मुदतवाढ विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर (ठर्ह्रीश्र छर्रीींशज्ञरी) यांना सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे. आमदार अपात्रता प्रकरणातील ठाकरे गटाने विधानसभा अध्यक्षांविरोधात दाखल केलेल्या प्रकरणात शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात एक महत्वाची सुनावणी पार पडली. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने ३१ डिसेंबर पर्यंत शिवसेना आमदारांच्या अपात्रतेवर निर्णय करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्षांना दिले होते.

शुक्रवारी झालेल्या सुनावणीत सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी विधानसभा अध्यक्षांना जास्तीचा वेळ लागेल असं सर्वोच्च न्यायालयाला सांगितलं. सर्वोच्च न्यायालयाने १० जानेवारी २०२४ पर्यंतची मुदतवाढ विधानसभा अध्यक्षांना दिली आहे.

अखेर निकाल लागणार?

साधारणतः दीड वर्षांहून जास्त काळ महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विरुद्ध उद्धव ठाकरे यांच्यात सुरू असलेला आमदार अपात्रतेचा वाद आगामी वर्षाच्या सुरुवातीला निकाली निघणार अशी चिन्ह दिसू लागली आहेत. त्यामागे दोन मुख्य कारणे आहेत:

१. विधानसभा अध्यक्षांच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी २० डिसेंबर पर्यंत आम्ही प्रक्रिया संपवून निकाल राखून ठेवणार आहोत, असे आश्वासन सर्वोच्च न्यायालयात दिले आहे.

२. निकाल राखून ठेवल्यानंतर आतापर्यंत दोन्ही बाजूंच्या आमदारांनी सादर केलेली जवळपास २ लाख ७१ हजार कागदपत्रे, सुनावणीतील दस्तावेज याचा अभ्यास करून निर्णय करण्यासाठी अध्यक्षांनी सर्वोच्च न्यायालयाकडून वेळ मागून घेतला आहे. त्यामुळे शक्यता आहे की विधानसभा अध्यक्षांना न्यायालयाकडून मिळालेल्या मुदतवाढीत निर्णय होऊ शकतो.

जर १० जानेवारी २०२४ पर्यंत निकाल देणे शक्य नाही झाले तर,

विधानसभा अध्यक्षांना सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेत जर निकाल देणे शक्य नसेल तर सर्वोच्च न्यायालयात पुन्हा एकदा अर्ज करून मुदत वाढवून मागितली जाऊ शकते. अशावेळी सर्वोच्च न्यायालयाने तयारी दर्शवली तर निर्णय करण्यासाठी पुन्हा एकदा मुदतवाढ दिली जाऊ शकते.

अध्यक्षांविरोधात अविश्वासदर्शक ठराव आला तर,

सध्या महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी जवळपास दररोज सकाळ –संध्याकाळ सुनावणी घेत आहेत. पण विधानसभा अध्यक्षांच्या विरोधात जर अविश्वासदर्शक ठराव आला किंवा फक्त नोटीस जरी आली तरीही संबंधित विधानसभा अध्यक्ष नबाम रेबिया खटल्यातील निकालानुसार आमदार अपात्रतेविषयीचा निर्णय करू शकत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरुद्ध उद्धव ठाकरे यांच्या खटल्यातील निकालात नबाम रेबिया प्रकरणातील निकाल अवैध ठरवलेला नाही, तर पाचपेक्षा जास्त न्यायाधीशांच्या न्यायपीठाने त्यावर निर्णय करावा असे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे नबाम रेबीया प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अविश्वासदर्शक ठरावाची नोटीस आमदारांच्या वतीने अध्यक्षांच्या कार्यालयाला देण्यात आली तर अध्यक्षांना आमदारांच्या अपात्रतेवर निर्णय करण्याचे अधिकार नसतात.

पिठासीन अधिकारी म्हणजेच विधानसभा अध्यक्ष बदलले गेले तर,

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार आमदार अपात्रतेवर निर्णय करताना विधानसभा अध्यक्ष लवाद म्हणजेच 'ढीळर्लीपरश्र' च्या भूमिकेत असतात त्यामुळे ते सर्वोच्च न्यायालयाला उत्तरदायी असतात. परंतु लवाद किंवा ढीळर्लीपरश्र चे अध्यक्ष / अधिकारी यांना एक ठरवून दिलेली कालमर्यादा असते. अपवादात्मक परिस्थितीशिवाय लवाद किंवा ढीळर्लीपरश्र चे अधिकारी निकाल राखून ठेवल्यावर बदलले गेले किंवा जर त्यांच्याकडून पदभार काढून घेण्यात आला तर नव्या अधिकाऱ्याला संपूर्ण प्रकरणावर पुन्हा सुनावणी घ्यावी लागते. तशीच नियम –परंपरा विधानसभा अध्यक्षांना लागू होते.

विधानसभा अध्यक्षांनी राजीनामा दिला तर,

आमदार अपात्रता प्रकरणावरील सुनावणी म्हणजे कायद्याच्या भाषेत अर्ध – न्यायिक प्रक्रिया आहे. ज्यावेळी विधानसभा अध्यक्ष राजीनामा देतात त्यावेळी त्यांच्यासमोर सुरू असलेली अर्ध– न्यायिक प्रक्रियाही शून्यवत होऊ शकते. कारण न्यायालयातील न्यायाधीश जर राखून ठेवलेला निकाल देण्यापूर्वी निवृत्त झाले किंवा त्यांच्यावर महाभियोग चालवला गेला तर नव्याने त्यांच्या जागेवर पदभार स्वीकारणाऱ्या न्यायाधिशांना सगळी सुनावणी नव्याने घ्यावी लागते, सर्व युक्तिवाद, उलटतपासणी ऐकावी लागते आणि नंतरच निकाल दिला जातो.

सध्याच्या परिस्थितीत शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाबाबत अशा असंख्य विविध कायदेशीर शक्यता जरी असल्या तरीही हा अधिकार सर्वस्वी विधानसभा अध्यक्षांचा असतो. विविध कायदेशीर शक्यता विचारत घेणे हा केवळ विचार– विमर्ष विस्ताराचा एक प्रयोग. याबाबतचे अधिकार आणि निर्णय निर्विवादपणे महाराष्ट्राचे विधानसभा अध्यक्ष यांच्याच कार्यकक्षेचा विषय आहे.

## काँग्रेस स्थापना दिनी नागपूरात काँग्रेसची भव्य रॅली



नागपूर : महाराष्ट्रात होणाऱ्या आगामी निवडणूका काँग्रेसने गांभीर्याने घेतल्याचे दिसत आहे. महाराष्ट्रातील पक्ष संघटनेत चैतन्य आणण्यासाठी काँग्रेसकडून महाराष्ट्रात महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या महारॅलीसाठी काँग्रेसचे राष्ट्रीय नेतृत्व महाराष्ट्रात येणार आहे. काँग्रेस पक्षाच्या स्थापना दिनी म्हणजेच २८ डिसेंबर रोजी नागपूरात काँग्रेसची भव्य रॅलीचे आजोजन करण्यात आले आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे संघटन महासचिव के. सी. वेणुगोपाल, मुकुल वासनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र काँग्रेस कमिटीची बैठक नागपूर येथे पार पडली. या बैठकीत या विषयी चर्चा करण्यात आली असून या बैठकीसाठी महारष्ट्र काँग्रेसचे मोठे नेतेही उपस्थित होते.विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी याबाबत माहिती दिली आहे. ते म्हणाले की, राज्यभरातील १० लाख काँग्रेस कार्यकर्ते या सभेला उपस्थित राहणार. तसेच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, माजी काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी आणि वर्किंग कमिटीचे सर्व सदस्य या महारॅलीला उपस्थित राहणार आहेत. तसेच नागपूर येथे झालेल्या बैठकीला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री व काँग्रेस कार्यसमितीचे सदस्य अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज उर्फ बंटी पाटील आणि माजी मंत्री प्रदेश, कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते.


## जाळपोळीत मराठा संघटनांचा हात नाही : संदीप क्षीरसागर

नागपूर : नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात शुक्रवारी अनेक मुद्द्यांवरून विधानसभेत जोरदार चर्चा झाली. दरम्यान आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीडमध्ये घडलेल्या घटनेवर त्यांची भूमिका विधानसभेत मांडली. ते म्हणाले की, या जाळपोळीत मराठा संघटनांचा हात नाही. या घटनेची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे आणि या यामागचा मुख्य आरोपी शोधून काढले पाहिजे. दुकाने, पक्षांची कार्यालय जाळण्यात आली. समाजकंटकांनी नियोजन आखून माझ्या घराची लाईट आणि पाण्याची पाईप तोडली. याचे सीसीटीव्ही व्हीडीओ माझ्याकडे आहेत, असे ते म्हणाले क्षीरसागर म्हणाले की, हा प्रकार होत असताना पोलिसांची गाडी माझ्या घराबाहेर तैनात होती. पण, समाजकंटक आल्यानंतर पोलिसांची गाडी बाजूला गेली. जाळपोळीच्या घटना घडल्यावर मी बीडमध्ये नव्हतो.

## विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा परीवारातील विलास सहकारी साखर कारखाना युनीट २ कडून गळीत हंगाम 2023-24 मधील अवघ्या ४० दिवसात १ लाख ५१ हजार मे. टन

लातूर प्रतिनिधी : शुक्रवार दि. १५ डिसेंबर २०२३ विलास सहकारी साखर कारखाना लि., युनीट २ तोंडार ता. उदगीर येथील साखर कारखान्याने एक दिवसात ४ हजार ७० मे. टन ऊसाचे ऊच्चांकी गाळपाचा विक्रम केला आहे. या हंगामाच्या सुरूवातीपासूनच ऊसतोडणी यंत्रणेचा आणि गाळपासाठी तांत्रीक कार्यक्षमतेने पूर्ण वापर करून गाळप ऊसाचे केले जात आहे, यामुळे साखर ऊतारा देखील चांगला मिळत आहे. मांजरा परिवारातील विलास सहकारी साखर कारखाना लि., युनीट २ च्या माध्यमातून उदगीर, जळकोट, देवणी या भागातील ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप वेळेवर केले जात आहे. या कारखान्याकडून ऊस उत्पादकांच्या ऊसाला चांगला ऊसदर देखिल देण्यात येत आहे.यामुळे तेथील शेतकऱ्यांचे जीवनमान देखील बदलत आहे. या हंगामात विलास सहकारी साखर कारखाना लि., युनीट २ ने विक्रमी गाळप आणि साखर ऊत्पादन केल्या बददल सर्वांचे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक





कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी अभिनंदन करून हंगामाच्या पूढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विलास साखर कारखाना युनीट – २ येथे गळीत हंगामाच्या ४० व्या दिवशी १४ डिसेंबर २०२३ रोजी एक दिवसात ४ हजार ७० मे. टन ऊसाचे ऊच्चांकी गाळप केले. आज अखेर १.५१ लाख मे.टन ऊसाचे गाळप आणि १ लाख ६३ हजार ७०० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले असून आज अखेर दैनदीन साखर ऊतारा १०.९३ इतका आहे.तसेच गळीत हंगामात ऊसतोडणी वाहतूक यंत्रणा व तांत्रीक कार्यक्षमतेचा पूर्ण वापर केला जात आहे. पावसाची परिस्थिती पाहता हंगामात पाण्याची बचत करून पाण्याचा पूर्नवापर केला जात आहे, हंगामात कारखाना बंद राहणार नाही यांची देखील काळजी घेतली जात आहे, अशी माहिती व्हा.चेअरमन रविंद्र काळे व युनीट २ चे कार्यकारी संचालक ए.आर.पवार यांनी दिली आहे.आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांची प्रेरणा, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांचे मार्गदर्शन व संस्थापक चेअरमन माजी मंत्री,आमदार अमित विलासराव देशमुख साहेब, लातूर ग्रामिणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांचे नेतृत्वाखाली विलास सहकारी साखर कारखाना युनीट २ यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.गळीत हंगामाच्या सुरूवातीलाच ऊस गाळप आणि साखर उत्पादनात विक्रम केल्या बददल माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख व संस्थापक चेअरमन आमदार अमित विलासराव देशमुख व चेअरमन वैशालीताई देशमुख व लातूर ग्रामिणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी ऊस उत्पादक शेतकरी, सर्व संचालक मंडळ,कारखान्याचे आधिकारी, कर्मचारी वर्ग, वाहतूक ठेकेदार, तोडणी मंजूर व कंत्राटदार या सर्वांचे अभिनंदन केले आहे.

## लव्ह जिहादविरोधात कायदा करणार

नागपूर : प्रतिनिधी

लव्ह जिहादविरोधी कायद्याबाबत राज्य सरकार गंभीर आहे. यासंदर्भात लवकरच निर्णय होईल, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिंदुत्ववादी संघटनासोबत झालेल्या बैठकीत दिले. हिंदू जनजागृती समिती, श्रीशिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, सकल हिंदू समाज, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, हिंदू विधिज्ञ परिषद, सनातन संस्था, संकल्प हिंदू राष्ट्र अभियान, अखिल भारतीय ब्राम्हण महासंघ, राष्ट्रीय युवा गठबंधन, सर्वभाषिक बाम्हण महासंघ, चित्पावन ब्राम्हण महासंघ आदी संघटनांच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा केली. यावेळी बैठकीला ग्राम विकासमंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री संजय राठोड, शिवसेनेचे मुख्य प्रतोद आमदार भरत गोगावले, आमदार प्रताप सरनाईक उपस्थित होते.

बैठकीमध्ये लव्ह जिहाद तसेच मंदिरांना मदतीच्या मुद्यावर लक्ष वेधण्यात आले. यावर मुख्यमंत्री शिंदे म्हणाले,'लव्ह जिहादविरोधी कायदा करण्याविषयी शासन अत्यंत गंभीर आहे. कायद्यासंदर्भात राज्य सरकारने ब–याच गोष्टी केलेल्या आहेत. लवकरच या संदर्भात तुम्हाला निर्णय समजेल.

## मराठा आणि धनगर समाजाला आरक्षण मिळावे यासाठी शेखर निकम यांची अधिवेशनात मागणी

नागपूर: मराठा आणि धनगर समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आग्रही मागणी चिपळूण–संगमेश्वरचे लोकप्रिय आमदार शेखर निकम यांनी नागपूर अधिवेशनात केली.

सध्या सुरू असलेल्या नागपूर अधिवेशनात आमदार शेखर निकम यांनी आपले म्हणणे मांडताना सांगितले की, सध्या राज्याचे मुख्यमंत्री त्याचबरोबर दोन्ही उपमुख्यमंत्री अतिशय प्रामाणिकपणे काम करत आहेत. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आपण राज्याच्या मुख्यमंत्र्यांनादेखील पुरेसा वेळ देण्याची गरज आहे. मराठा समाजाला न्याय हक्काचे आरक्षण मिळालेच पाहिजे या भावनेतूनच मी बोलत आहे. कुणबी ही वेगळी जात आहे आणि मराठा हा वेगळा समाज आहे. त्यामुळे कुणबी समाजाच्या हिश्याच्या जागा न हिरावता मराठा समाजाला स्वतंत्र जात म्हणून आरक्षण दिले गेले पाहिजे. मराठा




खूप काही श्रीमंत आहे अशी जी समज आहे ती थोडीशी चुकीची आहे. कोकणातला मराठा समाज आरक्षणापासून वंचित आहे. या समाजाला शिक्षणासाठी स्कॉलरशिप १००% करणे गरजेचे आहे. तसेच इतर गोष्टीसाठी तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी उद्योग धंदा निर्मिती असेल, ग्रामीण पर्यटन असेल, छोटे–मोठे बंधाऱ्याच्या निमित्ताने शेतीकडे पुन्हा बघायचं असेल ह्या गोष्टी होणं गरजेचं आहे. त्यासाठी कोणत्याही जाचक अटी न लावता व्यावसायिक कर्ज मिळाले पाहिजे. यात कोणतेही राजकारण न करता विचार करून कोणत्याही परिस्थितीत आणि चांगल्या पद्धतीने आरक्षण मिळावे ही अपेक्षा व्यक्त करतो.

त्याचबरोबर धनगर समाजाला देखील आरक्षण मिळण्याच्या बाबतीतला शासन निश्चित विचार करेल पण त्यापूर्वी माझी कोकणाच्या निमित्ताने एवढीच अपेक्षा आहे की, आमचा धनगर समाज अतिशय गरीब आहे. तो खूप डोंगरांमध्ये राहत असतो. तिथे जाण्यासाठी रस्ते सुद्धा नाहीत, धनगरांच्या जागा ज्या जागेमध्ये घर आहे ती घरे त्यांच्या नावाने नाही, शिक्षणासाठी काही अडचणी येतात त्या शिक्षणाच्या अडचणी देखील सोडवण्यासाठी सरकारने प्रयत्न करावा व या प्रक्रियेत विरोधी पक्षाने विरोध न करता समन्वयाने सरकारला सहकार्य करावे, अशी अपेक्षा आमदार शेखर निकम यांनी यावेळी व्यक्त केली.

## विश्वकर्मा योजनेंतर्गत कारागिरांना प्रशिक्षण

नवी दिल्ली : वृत्तसंस्था प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेंतर्गत सर्व काही सुरळीत झाले तर पारंपरिक व्यवसायात गुंतलेल्या कारागिरांसाठी एका वरदानापेक्षा कमी नसेल. या योजनेंतर्गत पारंपरिक व्यवसायांशी संबंधित तरुण कारागिरांना १८ व्यवसायांमध्ये एक आठवड्याचे मोफत प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षणादरम्यान त्यांना प्रतिदिन ५०० रुपये भत्ता दिला जाईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना टूल किट खरेदी करण्यासाठी २० हजार रुपये देण्यात येतील. याशिवाय त्यांना स्वत:चा रोजगार निर्माण करण्यासाठी बँकांमार्फत १ लाख ते ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज हमीशिवाय दिले जाईल, असे सांगण्यात आले.पंतप्रधान विश्वकर्मा योजनेंतर्गत देशातील पारंपरिक कारागीर जसे सुतार, न्हावी, कुंभारकाम करणारे, शिंपी, हस्तकला आणि संबंधित १८ प्रकारच्या व्यवसायांशी निगडित कारागीर यांना एक आठवड्याचे विनामूल्य प्रशिक्षण दिले जात आहे आणि टूल किट खरेदी करण्यासाठी २० हजार रु. देण्यात येतील. रोजगार निर्मितीसाठी बँकांमार्फत हमीशिवाय ५ टक्के वार्षिक व्याजदराने दोन हप्त्यांमध्ये ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज दिले जाईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी, अर्जदारांना श्रमिक पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा लागेल.अर्जदारांच्या त्रिस्तरीय पडताळणीनंतर त्यांना योजनेचा लाभ दिला जाईल. ग्रामीण आणि शहरी संस्थांसाठी पडताळणीसाठी स्वतंत्र यंत्रणा आहेत.

## संपादकीय....

# जीवाश्मांच्या जिवावर..

या टप्प्यावर अचानक जीवाश्म इंधनांची वाट बदलून पर्यायी मार्गावर सुरुवात करणे शक्य नाही, हे ठीक. परंतु तसे भान आपल्याकडे धोरणकर्त्यांनी राखले पाहिजे. या टप्प्यावर अचानक जीवाश्म इंधनांची वाट बदलून पर्यायी मार्गावर सुरुवात करणे शक्य नाही, हे ठीक. परंतु तसे भान आपल्याकडे धोरणकर्त्यांनी राखले पाहिजे.दुबई म्हणजेच संयुक्त अरब अमिरातीसारख्या तेल उत्पादक देशाच्या भूमीवर पर्यावरणदृष्टया अत्यंत कळीची 'सीओपी–ट्वेंटी एट' परिषद भरवली जाणे आणि तिच्या माध्यमातून एखादा बऱ्यापैकी सर्वमान्य तोडगा प्रसृत होणे हा आश्वासक विरोधाभासच. जवळपास दोन आठवडय़ांची ही परिषद वातावरण बदल आणि हवामानाशी संबंधित आणखी एक अपयशी परिषद ठरू पाहात होती. पण परिषदेचे अध्यक्ष आणि संयुक्त अरब अमिरातींच्या सर्वात मोठया तेल कंपनीचे प्रमुख सुल्तान अल जबेर यांनी पुढाकार घेऊन, अंतिम मसुद्यातला मजकूर काहीसा बदलला आणि या बदलास बहुतेक देश राजी झाले. हा आणखी एक विरोधाभास! त्यामुळे अंतिम मसुदाही मंजूर झाला. या मसुद्यानुसार, जीवाश्म इंधनांचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करून ऊर्जेची गरज इतर 'अधिक स्वच्छ' इंधनस्रोतांच्या माध्यमातून भागवण्याविषयी मतैक्य झाले आहे. 'जीवाश्म इंधनांना सरसकट निवृत्त' अर्थात फेज–आउट करण्याचा आग्रह प्रगत, श्रीमंत, पाश्चिमात्य देशांनी धरला होता. तो पर्याय अजिबात व्यवहार्य नसल्याचे तेल उत्पादक आणि विकसनशील देशांचे म्हणणे. या एका मुद्दयावर परिषद अनिर्णितावस्थेकडे ढकलली जात होती. अखेरीस मध्यम मार्ग काढण्यात आला. त्यातही सर्वात शहाणिवेचा भाग म्हणजे, जीवाश्म इंधनाचा वापर 'पूर्णपणे बंद' करण्याचा वेडगळ आणि अव्यवहार्य पर्याय सोडून देण्यात आला. या शतकाच्या मध्यापर्यंत तरी कोळसा, खनिज तेल, नैसर्गिक वायू या तीन प्रमुख जीवाश्म इंधनस्रोतांचा वापर पूर्णपणे थांबवता येणे शक्य नाही, यावर मतैक्य झाले. त्याऐवजी पर्यायी आणि स्वच्छ ऊर्जास्रोतांकडे वळताना, प्रदूषक इंधन निर्मितीप्रक्रियेतील हरितवायू उत्सर्जन कमी कसे करता येईल, यावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरले. अर्थात अंतिम मसुद्यामध्ये किमान जीवाश्म इंधनांचा उल्लेख तरी झाला, जो आजवर सातत्याने टाळला जात होता यातही अनेक संघटना आणि पर्यावरणतज्ज्ञांना समाधान वाटले. पण ही लढाई मसुद्यापुरती सीमित नाही. किंबहुना, ज्ञात इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष असा २०२३ या वर्षांचा लौकिक नुकताच नोंदवला गेला आहे. त्यामुळे तातडीने काही कृती करण्यासाठी यापेक्षा योग्य वेळ मिळणार नाही. औद्योगिकीकरण आणि खनिज तेलाच्या शोधानंतरच्या काळात पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे. ही वाढ उद्योगपूर्व युगातील तापमानाच्या तुलनेत दोन अंशांपेक्षा अधिक झाली, तर पर्यावरणाचा समतोल पूर्ण बिघडेल. प्रदीर्घ काळ उष्णतेच्या लाटा, पर्जन्यमानाचे असमतोल वितरण त्यामुळे एकीकडे प्रलंबित दुष्काळ तर दुसरीकडे अल्प काळात नि अल्प टापूत वाजवीपेक्षा अधिक पावसामुळे पूरस्थिती, देशोदेशी उग्र बनत चाललेली वणव्यांची समस्या अशा अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. हे टाळायचे असेल तर पृथ्वीची तापमानवाढ उद्योगपूर्व तापमानापेक्षा दीड अंश सेल्सियसपर्यंत आणणे हे पहिले उद्दिष्ट आहे. सध्या ही वाढ १.१ सेल्सियस इतकी झाल्याचे विविध प्रयोगांनी दाखवून दिले आहे. परंतु काहीही केले नाही आणि सारे काही असेच चालू दिले तर लवकरच ही वाढ दोन अंश सेल्सियसपेक्षा अधिक होईल. एकदा ती सीमारेषा ओलांडल्यास तेथून मागे फिरणे शक्य होणार नाही अशा इशारा पर्यावरणतज्ज्ञ देतात. याबाबत काही प्रारूपसम गृहीतके संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरणविषयक अभ्यासगटाने (आयपीसीसी) सादर केली आहेत जी थरकाप उडवणारी आहेत. तापमानवाढ दोन अंश सेल्सियसच्या आसपास गेलीच, तर विषुववृत्त आणि ध्रुवीय प्रदेशांमधील टापूमध्ये सरासरी तापमानवाढ ४ अंश सेल्सियस राहील. समुद्रपातळीत ०.१ मीटरने वाढ होईल, ज्याचा फटका किनारी भागांत वसलेल्या जवळपास एक कोटी नागरिकांना बसेल. महासागरांतील जवळपास ९९ टक्के प्रवाळ बेटे नष्ट होतील, ज्यामुळे सागरी अन्नसाखळीवर विपरीत परिणाम होईल. वाढीव तापमानाचा परिणाम सध्यापेक्षा दुपटीने अधिक वनस्पती आणि पृष्ठवंशी प्राण्यांच्या अस्तित्वावर होईल. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे, सततच्या हवामान संकटांमुळे कोटयवधी माणसे सन २०५० पर्यंत गरिबीत ढकलली जातील. हे टाळायचे असेल, तर आतापासूनच दूरगामी उपाय करावे लागतील. यासाठी पृथ्वीचे तापमान वाढवणारा सर्वात मोठा घटक म्हणजे कर्ब आणि तो उत्सर्जित करणारी सर्वात मोठी शृंखला जीवाश्म इंधननिर्मितीची असल्याचे गृहीत धरून त्यांच्या वापरावर बंधने आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.या पवित्र्यामध्ये काही विसंगती दिसून येते. तेल उत्पादक देशांनीच सर्वाधिक प्रयत्न केले पाहिजेत, असा समज यातून पसरवला जातो. इंधननिर्मितीसाठी जीवाश्मांचे प्रज्वलन होत असताना कर्ब आणि मिथेन हे दोन घटक सर्वाधिक उत्सर्जित होतात आणि पृथ्वीच्या एका वातावरणीय स्तरात अडकून पडतात. त्यामुळे तापमानवाढ होते हे मान्य. पण तेल उत्पादकांवर जबाबदारी ढकलून मोकळे झाले, की बेसुमार जंगलतोड, महागडे पर्यायी इंधनस्रोत, विजेवरील वाहनांविषयी अवास्तव आणि अव्यवहार्य संकल्पना या दोषांवरही आपोआप पांघरूण ओढले जाते. कोळशाच्या वापरात आमूलाग्र घट करावी, या प्रस्तावाला चीन, भारत, नायजेरिया या देशांनी कडाडून विरोध केला आहे. चीन हा सर्वाधिक विजेवर चालणाऱ्या वाहनांचा उत्पादक आणि निर्यातदार देश. या वाहनांसाठी इंधन म्हणून वापरली जाणारी वीज हवेतून निर्मिता येत नाही. ती कोळसा जाळूनच तयार होते. पर्यायी ऊर्जास्रोतांच्या वापराविषयीदेखील अनेक गैरसमज आहे. स्वच्छ व हरित ऊर्जा ही पुढील अनेक वर्षे जीवाश्म ऊर्जास्रोतांची जागा घेण्यासाठी आवश्यक प्रमाणात निर्मिलीच जाणार नाही हे सत्य आहे. भारतात हल्ली खासगी आणि सरकारी पातळीवरही सौरऊर्जेचे गोडवे गायले जात आहेत. भारत हा सौरऊर्जानिर्मितीचे जगातील प्रमुख केंद्र बनू शकतो, कारण येथे सूर्यप्रकाश मुबलक प्रमाणात आहे, म्हणे. ते मान्यच. पण सौर ऊर्जेपासून प्रत्यक्षात वापरकर्त्यां ऊर्जेची निर्मिती किती प्रमाणात होऊ शकते आणि त्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान किती खर्चीक आहे याविषयी येथे बहुतांना फार काही ज्ञात नाही. परंतु नवीकरणीय ऊर्जा, स्वच्छ ऊर्जा, हरित ऊर्जा, पर्यायी ऊर्जा असे शब्द वापरले की जीवाश्म ऊर्जास्रोत म्हणजे काही तरी अत्यंत टाकाऊ आणि प्राणघातक घटक असल्याचा ग्रह होतो. भारतासारख्या मोठया आणि प्रगतशील देशाला अजूनही जीवाश्म इंधनांवरच अवलंबून राहावे लागणार आहे. प्रगतीच्या आलेखवक्रावरील कोणत्या बिंदूवर कोणता देश आहे हे अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

# संसद हल्ला आणि सुरक्षा गांभीर्य..

संसद हे असे ठिकाण आहे कि जेथुन संपूर्ण देशातील प्रत्येक नागरिकांचे हित व संरक्षण केले जाते. परंतु संसदेमध्येच अतिरेकी घुसुन हल्ला करत असतील तर खुप मोठा प्रश्न वेगवेगळ्या बाजुने उभे राहतात. संसद देशातील सर्वात सुरक्षित आहे. जर तेथे घुसखोरी होऊन हल्ला होऊ शकतो तर देशातील इतर ठिकाणचे आणि सर्वसामान्य जनतेचे संरक्षणाचा प्रश्न उपस्थित राहतो.

मुळात सर्वात महत्वाचा प्रश्न हा आहे की संसदेमध्ये घुसखोरी करून अश्रुधुर सोडणारे दहशतवादी पकडल्याने आंतरराष्ट्रीय बातमी होऊन देशाची सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आला. परंतु आंतरराष्ट्रीय बातमीचे गांभीर्य व तिव्रता कमी करून जस काय एखाद्या सार्वजनिक ठिकाणी काही घडले अशा प्रकारचे वृत्त प्रस्थापित स्ट्रीम मिडिया देऊन संसदेत जाऊन दहशत निर्माण करणाऱ्या कृत्याला सर्वसाधारण कृत्याप्रमाणे मांडताना दिसत आहेत. देशाच्या सुरक्षा व्यवस्थेला आव्हान करून आणि करोडो जनतेचे लोकप्रतिनिधी असलेल्या ठिकाणी जाऊन दहशत निर्माण करणे याला दहशतवादी कृत्यच म्हणत असतात. शेतकरी आंदोलन, विद्यार्थी आंदोलन, वैचारिक संमेलने यांचा थेट संबध नक्षलवादी व परकिय शक्तीशी दाखवून न्यायासाठी आणि जनतेच्या हितासाठी रस्त्यावर आलेल्या लोकांवर देशद्रोहाचे खटले भरून त्यांना दहशतवादी संबोधले जाते आणि संसदेवर हल्ला करणाऱ्यांना आरोपी माणले जाते. यामुळे स्ट्रीम इलेक्ट्रॉनिक मिडियाची वैचारिक दिवाळखोरी लक्षात येते. गंभीर विषयाला सौम्य रुप देऊन गंभीर विषय दाबण्याचे काम हा मिडिया करून लोकशाहीच्या हत्येमागे मिडीयाचा सुद्धां खुप मोठा वाटा आहे. प्रेम प्रकरणाला झालेल्या गुन्ह्याला लवजिहाद चे स्वरूप देऊन त्यावर ओढून ताढून चर्चा घडवून आणुन दोन समुहात वाद व व्देष पसरणारा मिडिया देशाच्या संसदेवर हल्ला होताना, देशाच्या सुरक्षा यंत्रणेला दहशतवादी शक्तीकडून आव्हान देताना गप्प राहतो, त्यावर कोणतीही चर्चा घडवून आणली जात नाही तेव्हा लक्षात येते इलेक्ट्रॉनिक्स मिडीया जनतेचा आवाज उठलणारा नाही तर तो पक्षाचा अजेंडा चालवणारा मिडीया आहे. दहशतवादी कृत्याला सौम्य रुप देऊन बाजु कमकुवत करणे हे राष्ट्रहितासाठी खुप घातक असते. दुसरी आश्चर्याची बाब म्हणजे पकडले गेलेले दहशतवादी या मध्ये एकही मुस्लिम नाव नाही. जर यामध्ये एक जरी मुस्लिम नाव असते तर स्ट्रीम मिडियाने ओरडून ओरडून मुस्लिमांना बदनाम केले असते. मुस्लिमांना दहशतवादी, व इतर देशाशी संबधीत समजून संसद हल्ला प्रकरण किमान महिनाभर तापवून धरले असते. संसदेवरचा हल्ला खरोखरच माणसाची झोप उडवणारा आहे. चिंतेचा विषय आहे. परंतु मिडीया ने सौम्य बाजु मांडल्याने लोकांना त्यांचे गांभीर्य नाही. जर मिडीया ने ओरडून ओरडून सांगितले असते. देश धोक्यात आहे, संसदेवर हल्ला झाला, आणि हल्लेखोर मुस्लिम असते तर या हल्याचा निषेध गावागावात झाला असता. दहशतवाद्यांना तात्काळ शिक्षा व्हावी म्हणून आंदोलने झाली असती. लोकांना देश व देशातील जनता असुरक्षित वाटायला लागली असती. परंतु मिडीया ला विषय गांभीर्याने घेण्यासाठी मुद्दाच सापडत नाही. मागे रेल्वे अपघातात बाजूला मशीद दाखवून रेल्वे अपघात झाल्याच्या द्वेषात्मक बातम्या पसरवणारे लोक, सोशल मिडिया युझर्स यांना संसदेवरील दहशतवादी हल्ला कोणी केला यावर बोलु वाटत नसणे म्हणजे देशात कृत्य काय घडले यावरून गांभीर्य ठरत नाही तर कोणी घडवून आणले म्हणजे जात बघुन गांभीर्य ठरवले जाते. संसदेच्या आवारात विनापरवाना पक्षीही उडू शकत नाही. तरीही दहशतवादी हल्लेखोर संसदेमध्ये जातात कसे हा खुप मोठा आणि गंभीर प्रश्न आहे. आणि या प्रश्नावर चर्चा होणे आवश्यक आहे. दहशतवादी कृत्य करणाऱ्या तरुणांना संसदेमध्ये जाण्याची पास आहे ती पास जर मुस्लिम खासदार किंवा इतर पक्षाच्या खासदारांनी दिली असती तर त्यांचा संबध थेट दहशतवादी संघटनेशी जोडून संपूर्ण देश कसा धोक्यात आहे असे दाखवले गेले असते. परंतु या प्रकरणात दहशतवादी कृत्य करणाऱ्यांकडे सत्ताधारी खासदारांनी पास दिल्याचे निष्पन्न झाल्याने त्यावर स्ट्रीम मिडीया बोलायला तयार नाही. काही दिवसापुर्वी कॉग्रेस खासदारांच्या घरी इडी ने छापा टाकून भ्रष्टाचाराच्या माध्यमातून लोकांना लुटून जमवलेले करोडो रूपयांची रक्कम पकडली. तेव्हा इडीने केलेल्या कारवाई मध्ये ज्या भ्रष्टाचारी खासदारांबाबत देशाच्या प्रधानमंत्री यांनी एक वक्तव्य केले होते ते म्हणजे जास्त पैसा कमवायचा असेल तर कॉग्रेस मध्ये जावे. मग प्रधानमंत्री यांनी केलेले तेच वक्तव्य संसद हल्याला लागु होणार का? ज्यांना संसदेवर हल्ला करायचा त्यांनी भाजपा खासदारांना भेटावे असे म्हणले तर चुक काय? हेच बिजेपी वाले विरोधी पक्षातील नेत्यांना एखाद्या आरोपी सोबत फोटो असले तर त्यांना ट्रोल करून कारवाईची मागणी करत होते. परंतु दहशतवादी कृत्य करणाऱ्यांना पास देणाऱ्या खासदारांची पक्षातून हकालपट्टी करून योग्य ती चौकशी करून त्यांच्या वर दहशतवादी कृत्याला समर्थन केल्याच्या आरोपाखाली कारवाई केल्या जाईल का? हा मुद्दा खूप महत्वाचा आहे. मुद्दा धर्माचा आणि पक्षाचा मुळीच नाही. देशाच्या व देशातील लोकप्रतिनिधी च्या सुरक्षेचा प्रश्न आहे. या प्रश्नांवर पक्ष, धर्म बघून मुळीच चौकशी व चर्चा होऊ नये पण यामध्ये ही सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, सरकार खरचं या प्रकरणाची सखोल चौकशी करून दहशतवादी तरुण व त्यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत करणारे सह दहशतवादी यांच्या वर दहशतवादी कृत्य करून लोकप्रतिनिधी च्या हत्येच्या कटाचे खटले भरून योग्य ती शिक्षा देतील का हा सखोल संशोधनाचा विषय झाला आहे. दहशतवादी हल्याचा विचार केला तर अनेक प्रश्न उपस्थित राहून सरकारचे अपयश दिसुन येते. परंतु महत्त्वाचा मुद्दा हाच कि बिजेपी खासदारांच्या गेटपासने आत गेलेले दहशतवादी बिजेपी शी संबधीत नसतील कशावरून?

दहशतवादी हल्ला करण्याबाठी बिजेपीच्या खासदारांनी गेटपास का दिली असेल? हल्ला घडवून आणण्यामागे नेमका हेतु कोणता असेल? हल्ला घडवून आणण्यासाठी सर्वसामान्य घरातील तरुणांची निवड का केली असेल? कारण कधीही चुकिचे काम करून घ्यायचे तर जाती धर्माच्या नावाखाली लोकांना भावनीक बनवून त्या भावनेला भांडवल बनवून त्याचा वापर केला जातो. परंतु संसदेवर दहशतवादी हल्ला करताना तरुणांच्या डोक्यात नेमके काय पेरले असेल? स्वतः च्या च देशात केवळ काही आमिषाला बघुन स्वतः च्या भविष्याचा विचार न करता गुन्हेगार मध्ये तरुण पाय ठेवत असतील तर त्या देशात बेरोजगारी किती असेल? त्या देशातील तरुणांच्या मनात राष्ट्रप्रेम किती असा असेल? त्या तरूणांना कुटुंबाची काळजी किती असेल असे गंभीर प्रश्न उपस्थित राहतात. परंतु हाताला काम नसल्याने गुन्हेगारी प्रवृत्ती कडे जर तरुण वळत असतील तर ही बाब देशाच्या सुरक्षतेसाठी गंभीर स्वरुपाची तर आहेच परंतु देशातील नागरिकांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने खुपच महत्वाची आहे. संसद हल्ला प्रकरणाची चौकशी ही केवळ गेटपास देणारे बिजेपी चे खासदार आहेत म्हणून योग्य दिशेने न होता, दहशतवादी व त्यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे मदत करणारे यांना सत्तेचा वापर करून पाठीशी घालण्याचा जर प्रयत्न केला गेला तर ही सर्वात वाईट घटना असेल. इलेक्ट्रॉनिक मिडीया संसद प्रकरणाला सौम्य करून देशातील नागरिकांची दिशाभूल करून दहशतवादी लोकांना अप्रत्यक्ष पणे मदत करण्याचा प्रयत्न करत आहेत. कधी कधी खरंच इलेक्ट्रॉनिक स्ट्रीम मिडीया च्या लाचारीची किव येते मिडीया हा जनतेचा असतो, विरोधी पक्ष म्हणून मिडीया ने भुमिका पार पाडायला पाहिजे तर मिडीया सरकारची बाजु घेऊन राजकीय पक्षाचा अजेंडा लोकांसमोर मांडत आहे हे ही खुप घातक आहे. मिडीया जरी संसद हल्याचे गांभीर्य दाखवत नसेल तरीही हि गंभीर बाब समजून घेणे खूप आवश्यक आहे. कारण सत्तेत असणारे, हल्ल्याला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत करणारे एकच असतील तर देशाचे व नागरिकांचे रक्षण कोणी आणि कोणापासून करायचे हा मोठा प्रश्न उपस्थित राहतो.

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# नव्या नेतृत्वांची नवी इनिंग

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणूक निकालांचा आनंदोत्सव संपल्यानंतर या राज्यांमधील नेतृत्वाचा सुकाणू कुणाच्या हाती जाणार याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली होती. त्यानुसार राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोराम या पाचही राज्यांमध्ये मुख्यमंत्री म्हणून निवडले गेलेले चेहरे पाहिल्यास त्यांना पहिल्यांदाच राज्याचा प्रमुख म्हणून सन्मान मिळाला आहे. हा सामायिक धागा असला तरी प्रत्येकाच्या निवडीमागे वेगवेगळी राजकीय समीकरणे आहेत आणि त्यांना प्रादेशिकच नव्हे तर राष्ट्रीय राजकारणाशी जोडलेला अर्थही आहे. आता हे नवे शिलेदार आपल्या पूर्वसुरींपेक्षा वेगळी वाट चोखाळत या राज्यांच्या विकासाला नवी दिशा देण्यात यशस्वी होतात का हे पहावे लागेल. त्यावरच या नेत्यांचे आणि त्या राज्याचे भविष्य अवलंबून असणार आहे.जस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोराम या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर या राज्यांच्या मुख्यमंत्रिपदी कोणाची वर्णी लागणार या चर्चेने राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. अखेर टप्प्याटप्प्याने त्याचा फैसला. त्यानुसार राजस्थानात भजनलाल शर्मा, तेलंगणामध्ये रेवंत रेड्डी, मिझोराममध्ये झोरम पीपल्स मूव्हमेंटचे नेते व माजी आयपीएस अधिकारी लालदुहोमा, मध्य प्रदेशात मोहन यादव आणि छत्तीसगडमध्ये राज्याचे आदिवासी नेते विष्णुदेव साय यांच्याकडे या राज्यातील सत्तेचा सुकाणू आला आहे. राजकारणामध्ये आणि सत्ताकारणामध्ये नव्या चेह–यांना संधी मिळाली पाहिजे, ही पक्षाच्या कार्यकर्त्यांबरोबरच सर्वसामान्यांचीही अपेक्षा असते. कार्यकर्त्यांच्या दृष्टीने 'किती वर्षे आम्ही सतरंज्या उचलायच्या' या भावनेतून ही सत्तापदे महत्त्वाची असतात; तर जनतेला नव्या चेह–यांच्या निमित्ताने नव्या विकासाची अपेक्षा असते. या दोन्ही घटकांचे समाधान करणारी निवड म्हणून या पाच मुख्यमंत्र्यांकडे पहावे लागेल. यानिमित्ताने देशातील पाच राज्यांमध्ये नवीन नेतृत्व उदयाला आले आहे ही लोकशाहीच्या दृष्टीनेही आश्वासक बाब म्हणावी लागेल. अन्यथा सत्तांतरे होत राहतात, पूर्वीचे सत्ताधारी पुन्हा सत्तेत येतात; पण मुख्य पदावरील व्यक्ती मात्र तीच राहते. कर्नाटकचेच उदाहरण घेतल्यास भाजपला पराभूत करून तेथे काँग्रेस सत्तेत आली; परंतु मुख्यमंत्रिपदासाठी डी.के. शिवकुमार यांना डावलून यापूर्वी मुख्यमंत्री राहिलेल्या सिद्धरामय्या यांचीच निवड करण्यात आली. बिहारसारख्या राज्यात तर २०१५ पासून अनेक राजकीय उलथापालथी झाल्या; पण मुख्यमंत्रिपदी नितीशकुमारच राहिले. पश्चिम बंगालमध्येही ममता बॅनर्जी या २०११ पासून म्हणजेच जवळपास १३ वर्षे मुख्यमंत्री आहेत. अशी अनेक उदाहरणे इतिहासात आणि वर्तमानात पाहायला मिळाली आहेत. या पार्श्वभूमीवर या पाच राज्यांतील नेतृत्वबदल हा सुखद धक्का देणारा म्हणावा लागेल.मिझोराममध्ये झोरम पीपल्स मूव्हमेंट या पक्षाचे नेते लालदुहोमा यांनी ८ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ७४ वर्षीय लालदुहोमा यांनी यापूर्वी आयपीएस अधिकारी म्हणून काम केले आहे. १९७२ ते १९७७ पर्यंत त्यांनी मिझोरामच्या मुख्यमंत्र्यांचे मुख्य सहाय्यक म्हणूनही काम केले. १९७७ मध्ये त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केली. पोलिस सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांनी गोव्यात गुन्हेगार आणि तस्करांना पकडण्यासाठी पथकप्रमुख म्हणून काम केले होते. १९८२ मध्ये त्यांची माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या सुरक्षा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. पुढे लालदुहोमा यांनी १९८४ मध्ये पोलिस सेवेचा राजीनामा देऊन काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्याच वर्षी लोकसभा निवडणूक लढवली आणि खासदार म्हणून निवडून आले. पुढे १९८६ मध्ये त्यांनी काँग्रेस नेत्यांशी मतभेद झाल्यानंतर मिझोराम काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि झोरम राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली होती. मागच्या निवडणुकीवेळी निवडणूक आयोगाने लालदुहोमांच्या पक्षाला मान्यता दिली नव्हती. मात्र, या निवडणुकीत मिझोरम नॅशनल फ्रंट, भाजप आणि काँग्रेस या तिघांना पराभूत करत लालदुहोमांनी स्वबळावर बहुमताचा आकडा गाठत मिझोरमची सत्ता एकहाती मिळवली आहे.तेलंगणामध्ये मावळते मुख्यमंत्री आणि बीआरएस पक्षाचे सर्वेसर्वा केसीआर राव यांची विजयाच्या हॅट्ट्रिकची संधी हिरावून घेत काँग्रेसने सत्ता काबीज केली. या विजयामध्ये रेवंत रेड्डी यांचा सिंहाचा वाटा असल्यामुळे मुख्यमंत्रिपदी त्यांची वर्णी लागणार हे निकाल लागताक्षणीच स्पष्ट झाले होते. रेवंत रेड्डी हे आक्रमक स्वभावाचे राजकारणी म्हणून ओळखले जातात. विद्यार्थीदशेत ते अभाविपशी जोडले गेले होते. त्यांचा राजकीय प्रवास पाहिल्यास कोणत्याच राजकीय पक्षात स्थिरावले नाहीत. या प्रवासाची सुरुवात चंद्रशेखर राव यांच्या तेलंगणा राष्ट्र समितीमधूनच झाली होती. काँग्रेसच्या तेलंगणामधील विजयात अँटी इन्कम्बसीचा वाटा जसा मोठा होता, तसाच निवडणूक जाहीरनाम्यात दिलेल्या वारेमाप आश्वासनांचा. या आश्वासनांची पूर्तता करण्याचे आव्हान रेड्डी यांच्यापुढे आहे. त्यानुसार महिलांना मोफत बसप्रवास आणि गरिबांसाठी १० लाखांचा आरोग्य विमा या योजनांची सुरुवात सोनिया गांधी यांच्या वाढदिनी करून जनतेने ज्या अपेक्षेने मतदान केले त्यांना न्याय देण्याबाबतची कटिबद्धता दर्शवण्याचा प्रयत्न केला आहे.तेलंगणा आणि मिझोराम वगळता उर्वरित तीन राज्ये ही हिंदी भाषिक पट्ट्यातील महत्त्वाची राज्ये आहेत. यापैकी राजस्थानातील मतदारांनी यंदा सत्तापालटाची परंपरा कायम ठेवत भाजपला सत्तेची संधी देऊ केली असली तरी २०१८ च्या निवडणुकीत 'मोदी तुझसे बैर नही, राजे तेरी खैर नही' असे म्हणत तत्कालीन मुख्यमंत्री वसुंधराराजे यांच्याविषयीची नाराजी स्पष्टपणाने दर्शवली होती. त्यामुळेच यंदाच्या विजयानंतर भाजपाकडून मुख्यमंत्रिपदी कुणाची वर्णी लागणार याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले होते. खुद्द वसुंधराराजे या सातत्याने मीच मुख्यमंत्री होणार अशा आविर्भावात दिल्ली वा–या करत होत्या; पण भाजपा नेतृत्वाने राजस्थानातील मतदारांच्या भावनांची दखल घेत त्यांना जाणीवपूर्वक दूर ठेवण्याचा निर्णय घेतला. तेथे प्रथमच निवडून आलेले आमदार भजनलाल शर्मा यांना मुख्यमंत्री बनवण्यात आले आहे. हा निर्णय अनेकांसाठी धक्कादायक ठरला. कारण वसुंधरा राजेंनंतर दियाकुमारी, बालकनाथ योगी यांची नावे चर्चेत होती. पण या सर्वांना छेद देत भजनलालांची निवड करण्यात आली. भजनलाल शर्मा हे संगानेरचे आमदार आणि राजस्थान भाजपचे सरचिटणीस आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून ते भाजप संघटनेचे काम पाहताहेत. पक्षाचे अतिशय एकनिष्ठ म्हणून त्यांची ओळख आहे. विशेष म्हणजे यंदाच्या निवडणुकीत पहिल्यांदाच ते विधानसभेच्या रिंगणात उतरले होते.सांगानेर हा भाजपचा सुरक्षित मतदारसंघ असला तरी आधीचे आमदार अशोक लौहाटी यांचे तिकिट कापून भजनलालांना तिकिट देण्यात आले होते. त्यांनी काँग्रेसच्या पुष्पेंद्र भारद्वाज यांचा ४८०८१ मतांनी पराभव केला. मध्य प्रदेशातही संपूर्ण निवडणुका या पंतप्रधान मोदींबरोबरच प्रदीर्घ काळ मुख्यमंत्रिपदी राहिलेल्या शिवराजसिंग चौहान यांच्या चेह–याने लढल्या गेल्या होत्या. त्यामुळे निकालानंतर दुस–या नावाचा मुख्यमंत्रिपदासाठी विचार केला जाईल याची कल्पनाच कुणी केली नव्हती. पण त्यांना संधी मिळणार नाही हे लक्षात आल्यानंतर केंद्रातील मंत्रिपद सोडलेल्या नेत्यांपैकी कोणाला तरी या पदी निवडले जाईल अशी शक्यता व्यक्त होत होती. पण भाजपने मोहन यादव यांच्याकडे राज्याची जबाबदारी सोपवून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. राजस्थान आणि मध्य प्रदेशातील हे धक्कातंत्र हा भाजपच्या रणनीतीचा एक भाग आहे. याआधीही गुजरात, उत्तराखंड, हरियाणा आदी राज्यांमध्ये भाजपने असेच धाडसी आणि धक्कादायक निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्रातही गतवर्षी झालेल्या ऐतिहासिक सत्तापालटानंतर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय घेऊन भाजपच्या पक्षश्रेष्ठींनी सर्वांनाच अचंबित केले होते. सामान्यत: राजकीय पक्ष मुख्यमंत्री, मंत्री आणि इतर पदांवर नेत्यांची नियुक्ती त्यांची ज्येष्ठता आणि अनुभव इत्यादी लक्षात घेऊन ठरवतात.मात्र भाजप हा फॉर्म्युला पाळत नाही. त्याच्यासाठी संघटना सर्वोपरी आहे. संस्थेसाठी एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून काम करणा–याला बक्षीस दिले जाते. संघटनेत दुफळी निर्माण करणा–यांना अनेकदा बाजूला केले जाते. वसुंधरा राजे यांना याचीच शिक्षा भोगावी लागली असावी. राजस्थानमध्ये वसुंधरा राजे यांनी त्यांच्या नेतृत्वाशिवाय भाजपला निवडणूक जिंकणे कठीण आहे, असा दावा करण्यास सुरुवात केली होती. केंद्रीय नेतृत्वाशी त्यांचे संबंधही सौहार्दाचे नव्हते. भाजपने निवडणूक जिंकल्यावर त्यांनी आपल्या छावणीतील नेत्यांची जमवाजमव सुरू केली आणि मुख्यमंत्रिपद आपल्यालाच मिळावे यासाठी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र भजनलाल शर्मा यांना पुढे करून भाजपने अशा नेत्यांना संघटनेत महत्त्व नसल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. मध्य प्रदेशात शिवराजसिंह चौहान यांच्याबाबत अशी स्थिती नव्हती. परंतु पाच वेळा खासदार आणि चार वेळा मुख्यमंत्रिपद असा प्रदीर्घ काळ सत्तेत राहिल्याने त्यांना दूर ठेवण्यात आले. या निवडणुकांमध्ये भाजपने मुख्यमंत्री म्हणून त्यांचा चेहरा पुढे केलेला नसल्याने निकालांनंतर मध्य प्रदेशला नवा मुख्यमंत्री मिळणार हे स्पष्ट झाले होते. भाजपने केंद्रीय मंत्री–खासदारांनाही रिंगणात उतरवले होते. त्यापैकी विजयी झालेल्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला आहे.त्यामुळे कदाचित शिवराजसिंह चौहान यांच्याकडे केंद्रातील मोठी जबाबदारी दिली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नवोदित मुख्यमंत्री मोहन यादव हेही संघाच्या जवळचे नेते मानले जातात. शिवराजसिंह चौहान यांच्या मंत्रिमंडळात यादव यांनी शिक्षणमंत्री म्हणून काम पाहिले होते. मोहन यादव हे मध्य प्रदेशातील भाजपाचा मोठा ओबीसी चेहरा आहेत. छत्तीसगडमध्येही विधानसभेची निवडणूक जिंकल्यानंतर अनेक बड्या चेह–यांना बाजूला सारून भारतीय जनता पक्षाने आदिवासी समाजातील ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री विष्णुदेव साय यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सोपवली आहे. अजित जोगी यांच्यानंतर झालेले ते आदिवासी समाजातील छत्तीसगडचे दुसरे मुख्यमंत्री. गेली ३३ वर्षे राजकारणात असलेल्या साय यांना सरपंच पदापासून ते केंद्रीय मंत्रिपद आणि संघटनेतील कामांचा मोठा अनुभव आहे. भजनलाल यांच्याप्रमाणेच साय हेदेखील सर्वसामान्यातले नेते म्हणून ओळखले जातात. मितभाषी स्वभावामुळे त्यांच्या या निवडीला कोणत्याही गटातून मोठा विरोध झाला नाही. राष्ट्रपतिपदी द्रौपदी मुर्मू यांच्या निवडीतून एक मोठा संदेश दिल्यानंतर झारखंड आणि ओडिशासह अन्य राज्यांतील आदिवासी मते मिळविण्यासाठी साय यांची निवड महत्त्वाची ठरणार आहे.



**********

–देवेंद्र व्यास, इंदोर

## आदिवासी शिक्षणाचा देवता.....

माजी आमदार गावित बाबा
वाढदिवसाच्या लाख लाख
शुभेच्छा
खडकावरच्या शाळेमधली
तहानलेल्या शिक्षणाची ढाल
झालास गावित बाबा तु!
तुझ्या याच कार्याला
शतदा शतदा करीतो
आम्ही लाल सलाम!
दगडाचा खडक,खडकाचा
कळस केलास तु!
शिक्षणाने तहानलेल्या बालकांचा
आधार झालास तु!
तुझ्या याच कार्याला
शतदा शतदा करीतो
आम्ही लाल सलाम!
जंगलातल्या दगडातून पाणी
काढीले अशी ताकद झालास तु!
शिकले धडे तुझ्या कार्याचे
असा आदर्श झालास तु!
गावित बाबा तुझ्या याच
कार्याला पुजितो आम्ही
असा आमुचा भगवंत झालास तु!
तुझ्या भागातील आदिवासींच्या
शिक्षणाची सुरुवात केलास तु!
शकडो विद्यार्थी घडवत
जिवनास आकार दिलास तु!
याच कार्याला सलाम आमुचा
अशी दिशा दिलास तू!
गावित बाबा तुझ्या याच
धाडसाला आमुचा लाल सलाम!
गावोगावी चालत माणसे
जोडत गेलास तु!
माणसातला माणूस शोधत
आदर्श निर्माण केलास तु!
माणसाची कदर करत
माणसांना आदर दिलास तु!
बाबा तु माणुसकीचा कळस
झालास तु!
तुझ्यातल्या माणसांला नेहमी
आमुचा लाल सलान!
शिक्षण शोधत शोधत आदर्श
शिक्षण संस्था निर्माण केलास
तु!
संस्था न म्हणता एक
परिवार बसवलास तु!
बाबा तु सर्व परिवाराचा
प्रमुख झालास तू!
तुझ्या याच प्रमुख कार्याने
अनेक कुटुंब घडवलास तु!
तुझ्या याच कार्याने आमुचा
लाल सलाम झालास तु!
तुझ्या वरचे लिखाण न थांबणारा
आमचा गावित बाबा झालास तु!
गावित बाबा झालास तु!

कवियत्री
स्वाती गव्हाणे कुर्हे
अधिक्षिका
आदर्श आश्रमशाळा
श्री भुवन नाशिक
९९२३७८३९११

# हिवाळ्यात लहान मुलांनी भरपूर पाणी प्यावे की नाही? जाणून घ्या, मुलांमधील निर्जलीकरणाची लक्षणे

जेव्हा हिवाळ्यात उष्णता नसते तेव्हा आपण गृहीत धरतो की, मुलांना उन्हाळ्याप्रमाणे जास्त पाणी पिण्याची आवश्यकता भासत नाही. पण तुम्हाला माहिती आहे का, आरोग्याच्या दृष्टीने मुलांना हिवाळ्यात भरपूर पाणी पिण्याची गरज असते. अशावेळी पालकांनी निर्जलीकरणाची लक्षणे जाणून घेणे अतिशय गरजेचे आहे. द इंडियन एक्स्प्रेसनी शालीमार बाग येथील मॅक्स सुपर स्पेशालिटीच्या बालरोग विभागाचे प्रमुख डॉ. परविंदर सिंह नारंग यांच्या हवाल्याने या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. आपल्याला नेहमी वाटते की निर्जलीकरण (डिहायड्रेशन) हे फक्त उन्हाळ्यात म्हणजेच उष्ण वातावरणात जाणवते. जेव्हा हिवाळ्यात उष्णता नसते तेव्हा आपण गृहीत धरतो की, मुलांना उन्हाळ्याप्रमाणे जास्त पाणी पिण्याची आवश्यकता भासत नाही. पण तुम्हाला माहिती आहे का, आरोग्याच्या दृष्टीने मुलांना हिवाळ्यात भरपूर पाणी पिण्याची गरज असते. अशावेळी पालकांनी निर्जलीकरणाची लक्षणे जाणून घेणे अतिशय गरजेचे आहे. द इंडियन एक्स्प्रेसनी शालीमार बाग येथील मॅक्स सुपर स्पेशालिटीच्या बालरोग विभागाचे प्रमुख डॉ. परविंदर सिंह नारंग यांच्या हवाल्याने या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.लहान मुलांमध्ये निर्जलीकरणाची लक्षणे दिसणे खूप साधारण गोष्ट आहे. जेव्हा मुले त्यांच्या कामात व्यस्त असतात तेव्हा त्यांना पाणी पिण्याची आठवण येत नाही. जर



त्यांच्या आजूबाजूला पाणी नसेल तर त्यांना अनेकदा तहान लागल्याचीसुद्धा जाणीव होत नाही आणि त्यांना अचानक निर्जलीकरण होते. जर तुम्ही मुलांबरोबर असाल तेव्हा नेहमी हातात पाण्याची बाटली ठेवा आणि त्यांना दर दोन तासांनी किंवा त्यापेक्षा जास्त वेळा वारंवार पाणी देत राहा. हवा उन्हाळ्यात गरम असते, पण हिवाळ्यात कोरडी असते, त्यामुळे शरीराला पाण्याची जास्त आवश्यकता भासते. निर्जलीकरणाची लक्षणे १. डोळे खोल जाणे आणि डोळ्याचा खालचा भाग काळा दिसणे.२. त्वचा कोरडी पडणे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आयुष्यमान कार्ड श-घधउ शिबीर

लातूर :- विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त आज शनिवार दि.१६/१२/२३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क टाऊन हॉल,येथे आयुष्यमान कार्ड श-घधउ शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आयुष्यमान भारत -प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अंतर्गत अंगीकृत रुग्णालयातून विविध आजारांवरील उपचारासाठी प्रती कुटुंब प्रती वर्षी रु.५ लक्ष ची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येते.यासाठी पात्र लाभार्थ्यांनी आपले आयुष्यमान ई -कार्ड काढून घेणे गरजेचे आहे. तरी शहरातील ज्या पात्र लाभार्थ्यांनी अद्याप त्यांचे आयुष्यमान कार्ड काढून घेतले नाही त्यांनी शनिवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, टाऊन हॉल येथे सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वा.पर्यंत उपस्थित राहून आपले ई -कार्ड काढून घेण्यात यावे असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# जागतिक स्तरावरील आर्थिकता सेवा बाजारपेठेमध्ये भारत एक महत्वाचे केंद्र बनू शकते: धर्मेंद्र प्रधान

लातूर - आज एनएसडीसी (छडऊउ) आणि बजाज फ़िन्सर्व तसेच एआयसीटीई (-खउढए) आणि बजाज फ़िन्सर्वमध्ये दोन एमओयु वरती भारताचा शिक्षण आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाचे केंद्र मंत्री असलेल्या श्री. धरमेंद्र प्रधान आणि ,कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाचे सचिव, श्री.अतुल कुमार तिवारी, तसेच एआयसीटीई (-खउढए) चे सदस्य सचिव , प्राध्यापक राजीव कुमार; आणि एनएसडीसी (छडऊउ) चे सीईओ आणि, एनएसडीसी (छडऊउ) इंटरनॅशनलचे चे महाव्यवस्थापक असलेले वेद मणी तिवारी तसेच बजाज फ़िन्सर्व चे अध्यक्ष आणि महाव्यवस्थापक असलेले संजीव बजाज यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली. या कार्यक्रमाला क्रुष इराणी, प्रेसिडेन्ट ग्रुप-सीएसआर आणि पल्लवी गंधालीकर - नॅशनल हेड-बजाज फ़िन्सर्व सीएसआर देखील उपस्थित होते. देशातील प्रमुख कौशल्य विकासाचे स्त्रोत असलेल्या एआयसीटीई(-खउढए, शिक्षण मंत्रालय अंतर्गत) आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (छडऊउ,कौशल्य विकास आणि उद्योजगता मंत्रालयांतर्गत) ,द्वारे भारतातील अग्रगण्य आणि वैविध्यपूर्ण अशा आर्थिक सेवा समूह असलेल्या,बजाज फ़िन्सर्व लिमिटेड सह एकत्र येऊन पदवीधर तरूणांना आर्थिक सेवा क्षेत्रामध्ये रोजगाराचा संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या कार्यक्रमाचा वेळेला बोलताना, श्री. धर्मेंद्र प्रधान यांनी एनएसडीसी (छडऊउ ) आणि एआयसीटीई (-खउढए ) चे बजाज फ़िन्सर्व बरोबर केल्या गेलेल्या एमओयुचे साक्षीदार असल्याचा आपल्याला अतीशय आनंद होत असून यामुळे आर्थिक सेवा क्षेत्रामधील रोजगार संधींकरिता तरूण पद्वीधर मुलं बॅकिंग, फ़ायनान्स आणि इन्श्युरन्स सर्टिफ़िकेट प्रोग्राम अंतर्गत तयार होतील अशी आशा व्यक्त केली. आज झालेल्या भागीदारीमुळे आर्थिक क्षेत्रामध्ये क्षमता निर्मीतीसह तरूणांना आर्थिक क्षेत्रातील डिजिटल माध्यमांमध्ये होणाऱ्या बदलांमध्ये सहभागी होण्याकरता भक्कम पद्धतीने तयार केले जाईल असे देखील ते म्हणाले. पंतप्रधानांचा विकसित भारत- व्हॉईस ऑफ़ युथ उपक्रमाचे सादरीकरण काल झाले ज्यात विकसित भारताकरिता तरूणांचा कल्पनाशक्तीला अधिक वाव मिळणार आहे, यामध्ये कौशल विकास आणि आर्थिक क्षेत्राची प्रगती ही भारताला विकसित बनविण्यास मदत करेल असे देखील त्यांनी अधोरेखीत केले. श्री. प्रधान यांनी आपल्या तरूण वर्गाने या विकसित भारताची निर्मीती ही ज्ञान, क्षमता, कौशल्य आणि योग्य स्वाभिमानाचा जोरावर करावी असे देखील सांगितले. ज्ञान आणि क्षमतेचा एक उच्चतम महामार्ग बनवत जागतिक आर्थिक सेवा क्षेत्रामध्ये भारताला एक महत्वाचे केंद्र बनविण्याचे कार्य आम्ही हाती घेतले आहे असे देखील ते म्हणाले. एआयसीटीई (-खउढए) चे अध्यक्ष , प्राध्यापक टी.जी सिथारमन यावर आपले विचार मांडताना म्हणाले, एमओयु वरती बजाज फ़िन्सर्वसह झालेली स्वाक्षरी ही शिक्षण आणि औद्योगिक-शिक्षणामध्ये एक नवीन साखळी निर्माण करणार आहे. यामुळे एआयसीटीई(-खउढए) चा दृष्टीकोनाचा माध्यमाने उद्योग आणि शिक्षण यातील दरी कमी करण्याचा एक प्रयत्न केला जाईल. या भागीदारीमुळे आर्थिकता, बँकिंग आणि इन्श्युरन्स क्षेत्रातील शिक्षण, इंटर्नशिप आणि नोकरीकरिता प्रक्षिक्षणाचा विविध संधी उपलब्ध होतील. एनएसडीसी (छडऊउ) , चे सीईओ आणि एनएसडीसी (छडऊउ )इंटरनॅशनलचे महाव्यवस्थापक वेद मणी तिवारी, यावेळी बोलताना म्हणाले , भारताचा आर्थिक क्षेत्राने गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणावर विकास आणि वाढ बघितली आहे. एनएसडीसी(छडऊउ) मध्ये ,आम्ही आमचे उद्दिष्ट हे तरूणांना सबळ करण्याचे ठेवले आहे ज्याकरिता आम्ही त्यांना कौशल्य विकास उपक्रमांतर्गत विविध संधी उपलब्ध करून देणार आहोत. याकरिताच बजाज फ़िन्सर्वसह केलेली ही भागीदारी एक महत्वाचे पाऊल ठरते आणि यामुळे आर्थिक क्षेत्रातील कुशलतेचा चेहरा मोहरा बदलण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. असे ही ते म्हणाले

बजाज फ़िन्सर्व लिमिटेड, चे अध्यक्ष आणि महाव्यवस्थापक, श्री. संजीव बजाज म्हणाले, आमची एनएसडीसी( छडऊउ) आणि शिक्षण मंत्रालयाशी झालेली भागीदारी ही आम्हाला तरूण वर्गामध्ये बदल घडवून आणण्यात मदत करेल ज्याकरिता त्यांना उत्तम कौशल्यासह अगिणित असे यशाचे दरवाजे देखील खुले होतील. यामुळे आर्थिक लवचिकतेस एकत्रित कामाचा संधी भविष्यात उपलब्ध होतील, आणि कौशल भारत, कुशल भारत हे वाक्य खरे करून दाखविले जाईल. बजाज फ़िन्सर्वचा भागीदारीमुळे, बँकिंग, फ़ायनान्स आणि इन्स्युरन्स सर्टिफ़िकेट प्रोग्राम (उझइत्रख) कौशल्य विकासाचा, १००- तासांचा एक अभ्यासक्रम विकसित केला आहे ज्याच्या माध्यमातून २०,००० उमेदवार तयार केले जातील , या अभ्यासक्रमाची निर्मीती ही उद्योग तज्ञ, प्रशिक्षण भागीदार, शैक्षणिक संस्था आणि मानसशास्त्रीय आरोग्य संस्थांचा मदतीने करण्यात आलेली आहे. उझइत्रख सध्या सुमारे ३५० + महाविद्यालयात २३ राज्य, १०० जिल्हे आणि १६०+ गावांमधून कार्यरत आहे. यांचा हेतू हा कौशल्य, शिक्षण आणि तरूण पदवीधर आणि एमबीएचा विद्यार्थ्यांमध्ये नेमका आत्मविश्वास निर्माण करण्याचा आहे, विशेषत: २ आणि ३ टियर शहरांमध्ये. असे केल्याने रोजगार क्षमता निर्माण होत असतानाच आर्थिक सेवा क्षेत्रामध्ये दीर्घकालीन कामाचा टिकावा लागावा म्हणून योग्य ते निर्णय देखील ते घेऊ शकतील. दोन्ही भागीदारींमुळे उत्तम अभ्यासक्रम निर्माण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले गेले असून यामध्ये आर्थिक, बॅकिंग आणि इन्श्युरन्स क्षेत्रांमध्ये सातत्याने होणाऱ्या बदलांचा देखील विचार केला गेला आहे, त्या अनुषंगाने चालू उद्योग क्षेत्रातील ट्रेन्ड्स, तंत्रज्ञानातील आधुनिकता, उत्तम सवयी या सगळ्यांना एकत्रपणे गुंफ़ण्याचा प्रयत्न केला गेला आहे. एनएसडीसी (छडऊउ) सह केलेली भागीदारी ही स्किल इंडिया डिजिटल (ड्खऊ) पर्यंत वाढविली जाईल- जे सगळ्या शासकिय- कौशल्य आणि उद्योजकता उपक्रमाकरिता एक प्रवेश द्वार असेल आणि ज्यामुळे विद्यार्थी फ़क्त शैक्षणिक योग्यताच घेऊन नव्हे तर त्या क्षेत्रातील व्यवसायिक कुशलता घेऊन देखील तयार होईल. रणनितीवर आधारीत भागीदारी ही उत्तम बँका, आर्थिक संस्था आणि विमा कंपन्यांसह देखील केली जाईल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण अशा संधी उपलब्ध होऊ शकतील. या भागीदारीमुळे इंटर्नशिप, कामाचा ठिकाणी प्रशिक्षण आणि उद्योग जगतातील खरे अनुभव घेण्याची संधी सुद्धा मिळेल. यामुळे वर्गातील शिक्षण आणि उद्योगाचा गरजांमधील असलेली दरी कमी होईल आणि व्यवसायिक भूमिका बजावताना उत्तम बदल घडून येतील.

विद्येचा विभागामध्ये अतिरिक्त कार्य करत असताना, यामुळे संपर्क आणि कामाचा ठिकाणी लागणाऱ्या एकत्रित कौशल्याप्रती देखील आत्मविश्वास निर्माण केला जाईल. आज पर्यंत, सुरवात केल्यापासून उझइत्रख द्वारे २ आणि ३ टियर गावांमध्ये ४०,००० पेक्षा अधिक उमेदवारांना प्रशिक्षण आणि लाभ मिळवून दिले गेले आहेत. एआयसीटीई (-खउढए) ने शिक्षण मंत्रालयाचा अंतर्गत, ओरिसा राज्याला अग्रस्थानी ठेवले आहे. यामुळे हा उपक्रम पहिल्या भागामध्ये ओरिसा राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये सुरू केला जाईल आणि तरूण कौशल्य उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना बजाज फ़िन्सर्व आणि स्किल इंडियामार्फ़त एकत्रित प्रमाणपत्र दिले जाईल.

# क्रिती सेननलादेखील आवडतो ‘बटर मेथी पराठा’; काय आहेत याचे सहा आरोग्यदायी फायदे पाहा

बनवायला सोपा आणि आरोग्यासाठी पौष्टिक असणारा मेथी पराठा किती पौष्टिक असतो माहीत आहे? आहारतज्ज्ञ सांगतात याचे फायदे पाहा. मेथीच्या पानांपासून बनवलेले मेथीचे पराठे सर्वांनाच आवडतात. परंतु, हे पराठे चवीला जितके सुंदर लागतात तेवढेच ते आपल्या आरोग्यासाठीदेखील फायदेशीर आहेत असे समजते. या पराठ्यांमध्ये फायबर, लोहा आणि जीवनावश्यक जीवनसत्व भरपूर प्रमाणात असल्याने हे पराठे आपल्या संपूर्ण आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात. असा हा पौष्टिक मेथी पराठा, अभिनेत्री क्रिती सेननचादेखील आवडता पदार्थ असल्याचे समजते. कारण क्रिती सेननने तिच्या सोशल मीडियावर, अमूल बटर + मेथी पराठा, माझ्या आवडीचा पदार्थ असे लिहले होते.मेथी पराठ्याचे शरीराला आणि आरोग्याला अनेक प्रकारचे फायदे होत असतात ते कोणते पाहा.१. पोषक घटक मेथी पराठ्यांमध्ये भरपूर प्रमाणात जीवनसत्वे, खनिजे आणि फायबर असल्याने आपल्या शरीरास आवश्यक असणाऱ्या पोषक घटकांचा पुरवठा या पदार्थांमधून होतो.२. रक्तातील साखरेवर नियंत्रण रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी, मेथीचा वापर केला जाऊ शकतो. असे असल्याने मेथी पराठा हा मधुमेह असणाऱ्या व्यक्तींसाठी उत्तम आहार ठरतो, असे मुंबई येथील रेजुआ एनर्जी सेंटरमधील आहारतज्ज्ञ डॉक्टर निरुपमा राव यांचे म्हणणे आहे.३. पचनसंस्था मेथी पराठ्यामध्ये असणारे फायबर आपल्या पचनाच्या क्रियेसाठी फार उपयुक्त असून, यांच्या सेवनाने बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.४. हृदयाच्या आरोग्यासाठी हृदयाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी मेथीचा फायदा



होतो. मेथीमुळे, कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.५. अँटी-इंफ्लेमेटरी घटक शरीरातील इंफ्लेमेशन/दाहकता कमी करण्यास मेथीचा उपयोग केला जाऊ शकतो, असे डॉक्टर राव म्हणतात.६. लोहाचे प्रमाण वाढवणे आपल्या शरीरात, रक्तातील लाल पेशी वाढवण्यासाठी लोहाची आवश्यकता असते. मेथीमध्ये लोह असल्याने रक्तातील लोहाची कमतरता भरून काढण्यास मदत होते. ज्यांना नैसर्गिकरित्या रक्तातील लोहाचे प्रमाण वाढवायचे असेल, त्यांनी मेथी घातलेले पराठे खाणे फायद्याचे ठरू शकते, असा सल्ला डेहेराडूनमधील, ‘सोलफिट क्लाउड किचनच्या संस्थापक आणि आहारतज्ज्ञ रूप सोनी यांनी दिला आहे.पराठ्यांसोबत बटर खायला कोणाला नाही आवडत? पण, ते किती खायचे याचेदेखील एक प्रमाण आहे. त्या प्रमाणाबाहेर खाऊ नये.बटरमध्ये असणाऱ्या फॅट्स आणि कॅलरीजमुळे हा पदार्थ थोड्या प्रमाणात खाणेच योग्य ठरेल. पराठ्यावर अगदी हलक्या हाताने पसरवलेले बटर पराठ्याची चव वाढवण्यास मदत करून फार प्रमाणात कॅलरीज वाढत नाही. त्यामुळे ते तितकेच खाणे योग्य ठरेल. आपल्या आहारानुसार आणि शरीराला जितकी गरज असेल, तेवढ्याच प्रमाणात बटर खाणे अपेक्षित आहे

, असेदेखील डॉक्टर राव यांचे म्हणणे आहे. डॉक्टर राव यांच्या मताशी आहारतज्ज्ञ रूपा यासुद्धा सहमती दर्शवतात आणि म्हणतात, बटर जरी पदार्थाची चव वाढवण्यासाठी मदत करत असले आणि चांगले फॅट्स देत असले तरीही त्याच्या अतिरिक्त खाण्यामुळे कॅलरीज वाढण्याची शक्यता असते.मेथी पराठा खाण्याची योग्य वेळ कोणती? आहारतज्ज्ञ रूपा यांच्या मते तुम्ही सकाळच्या नाश्त्याला मेथी पराठा खाणे चांगले राहील. यामुळे दिवसभर पोट भरल्यासारखे वाटू शकते. मेथी पराठ्यामध्ये असणारे फायबर आणि कर्बोदके कार्बोहायड्रेट हे दिवसभरासाठी तुम्हाला भरपूर ऊर्जा प्रदान करू शकते. त्यासोबतच सकाळी असा भरपेट नाश्ता केल्याने, मधल्यावेळात लागणारी भूक कमी होऊन तुम्हाला अवेळी काही खाण्यावर ताबा मिळवता येऊ शकतो.

# मधुमेही व्यक्तींसाठी भात कसा शिजवावा? कोणत्या प्रकारचा तांदूळ वापरावा? तज्ज्ञ काय सांगतात, जाणून घ्या

मधूमेही व्यक्तींनी भात खाणे पूर्णपणे बंद केले पाहिजे का? जाणून घ्या तज्ज्ञांचे मत मधूमेही व्यक्ती भात खाऊ शकतो की नाही? जाणून घ्या तज्ज्ञांचे मत (फोटो सौजन्य - फ्रिपीक, अनप्लॅश) भात हा भारतीय खाद्यपदार्थांतील मुख्य खाद्यपदार्थांपैकी एक आहे. अनेकांचे जेवण भाताशिवाय पूर्णच होत नाही. भातामध्ये भरपूर प्रमाणात कार्बो हायड्रेट असल्यामुळे ते पचण्यास जड अन्न मानले जाते; जे शरीरातील




इन्सुलिनची पातळी लक्षणीयरीत्या वाढवते. त्यामुळे साहजिकच मधुमेही व्यक्तींना भात न खाण्याचा सल्ला दिला जातो. पण, तरीही संतुलित आहाराचा भाग म्हणून त्यांना भाताचे सेवन करता येईल का किंवा त्यांना भात खाणे कायमचे बंद करावे लागेल? जाणून घ्या तज्ज्ञ काय सांगतात.मधुमेह हा एक दीर्घकाळ टिकणारा आजार आहे. हा आजार जेव्हा होतो जेव्हा स्वादुपिंड पुरेशा प्रमाणात इन्सुलिन तयार करीत नाही किंवा शरीराने तयार केलेल्या इन्सुलिनचा प्रभावीपणे वापर करू शकत नाही. इन्सुलिन हा एक हार्मोन आहे; जो रक्तातील साखर नियंत्रित ठेवतो. हायपरग्लेसेमिया किंवा वाढलेली रक्तातील साखर हा अनियंत्रित मधुमेहाचा एक सामान्य परिणाम आहे आणि कालांतराने त्यामुळे शरीराला, विशेषत: नसा आणि रक्तवाहिन्यांचे गंभीर नुकसान होते, असे गुरुग्राम येथील मणिपाल हॉस्पिटलच्या अंतर्गत औषध आणि मधुमेह तज्ज्ञ विभागाचे सल्लागार डॉ. मोहित सरन, यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना स्पष्ट केले.जगभरातील लाखो लोकांसाठी भात हे मुख्य अन्न आहे; परंतु ज्यांना मधुमेह आहे त्यांच्यासाठी रक्तातील साखरेच्या वाढण्याच्या चिंतेमुळे भाताच्या सेवनावर मर्यादा येऊ शकते. पण, काही सोपे बदल करून मधुमेही व्यक्तीही निरोगी आणि संतुलित आहाराचा भाग म्हणून भाताचा आनंद घेऊ शकतात, असे दिल्ली येथील सी. के. बिर्ला हॉस्पिटलच्या मधुमेह, लठ्ठपणा व अंतर्गत औषध विभागाचे प्रमुख सल्लागार डॉ. त्रिभुवन गुलाटी यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले.मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी आहारात भाताचा समाविष्ट करण्याची गुरुकिल्ली म्हणजे योग्य प्रकाराच्या तांदळाची निवड करणे. डॉ. गुलाटी यांनी मधुमेही व्यक्तींसाठी तांदळाचे योग्य प्रकार सुचवले आहेत.तपकिरी तांदूळ : फायबर आणि पोषक घटकांनी युक्त तपकिरी तांदळामध्ये पांढर्या तांदळाच्या तुलनेत कमी ग्लायसेमिक इंडेक्स असतो. याचा अर्थ हा तांदूळ रक्तप्रवाहात साखर खूप हळू हळू प्रमाणात सोडतो.बासमती तांदूळ : या लांब दाण्याच्या तांदळाचा भात किंचित चविष्ट असतो. सामान्य पांढर्या तांदळाच्या तुलनेत बासमती तांदळामध्ये कमी ऋख असतो. वन्य तांदूळ : तांत्रिकदृष्ट्या हा खरा तांदूळ नसला तरी वन्य तांदूळ (थळश्रव ठळलश) हा उच्च फायबर घटकांनी समृद्ध असून, त्याला एक अद्वितीय अशी अधिक वेगळी चव आहे आणि पोत शोधणाऱ्यांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे.भात खाताना आपण तो किती प्रमाणात खातो याचे निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे असे डॉ. गुलाटी यांनी सांगितले. प्रत्येक जेवणामध्ये १/२ कप शिजवलेला भात खाणे हा एक चांगला नियम आहे. एखादी व्यक्ती भात ज्या पदार्थांसोबत खाते, त्याचा त्यांच्या रक्तातील साखरेच्या पातळीवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. प्रथिने, भाज्या व निरोगी फॅट्ससह भाताचे सेवन केल्याने पचन मंद होण्यास आणि रक्तातील साखरेची वाढ रोखण्यास मदत होते. असे डॉ. गुलाटी यांनी स्पष्ट केले.

भाताचा आस्वाद घेण्याचे काही मधुमेहींसाठी योग्य मार्ग शिजवलेला भात कशासह खावा? : ग्रील्ड चिकन, टोफू (सोया पनीर) किंवा मासे, भाजलेल्या (इरज्ञशव) किंवा वाफवलेल्या भाज्यांसह शिजवलेला भात एकत्र खाऊ शकता.परतलेला भात कसा बनवावा? : परतलेला भात (त्रीळशव ठळलश) तयार करण्यासाठी पांढर्या तांदळाऐवजी तपकिरी तांदूळ वापरावा; ज्यामध्ये भरपूर भाज्या आणि लीन प्रोटीन्स वापरावे. भाजणे, तळणे यांसारख्या निरोगी स्वयंपाकाच्या पद्धती निवडा.सूपबरोबर भात खावा का? : बराच काळ पोट भरलेले राहावे यासाठी जेवणामध्ये भाजी किंवा चिकन सूपसह शिजवलेला भात खाऊ शकता.सॅलडसह भात खावा का? : चिरलेल्या भाज्या, औषधी वनस्पती वापरून बनवलेल्या सॅलडसह भात खा. हा एक परिपूर्ण हलका आहार किंवा साइड डिश आहे, असे डॉ. गुलाटी यांनी सांगितले.तांदळाचे वेगवेगळे प्रकार आणि प्रमाण तुमच्या शरीरावर कसा परिणाम करतात हे समजून घेण्यासाठी तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियमितपणे तपासा. ही माहिती तुम्हाला तुमच्या जेवणाबद्दल माहितीपूर्ण निवडी करण्यात मार्गदर्शन करू शकते.प्रत्येक व्यक्तीच्या आहाराच्या गरजा वेगळ्या असतात.

# डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा



ब्रह्मण मुंबई / प्रतिनिधी :– दादर आंबेडकर भवन इथे परमपूज्य, बोधिसत्व, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू व दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष : भीमराव यशवंत आंबेडकर साहेब यांचा वाढदिवस भारतीय बौद्ध महासभा मुंबई कार्यकारणी च्या अंतर्गत अती उत्साहात साजरा करण्यात आला. साहेबांना वाढदिवसांच्या लाख लाख हार्दिक शुभेच्छा देण्यासाठी वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन चे सुरेश मोहिते (महाराष्ट्र सरचिटणीस), सुनील भाऊ लोखंडे (मुंबई सचिव), प्रदीप गौतम साळवे (नवी मुंबई निरीक्षक व घाटकोपर तालुका अध्यक्ष), युसुफ भाई अन्सारी (शिवाजीनगर मानखुर्द तालुका अध्यक्ष), विनोद नरवाडे (ईशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष), सचिन साळुंखे (मुंबई सचिव), प्रकाश साळवे (फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया प्रमुख), शर्मिलाताई गायकवाड (पालघर जिल्हा अध्यक्ष), गौतम गवई (ठाणे जिल्हाध्यक्ष), नितीन (भाऊ) गोरे (नवी मुंबई जिल्हाध्यक्ष), सिमाताई रणदिवे (नवी मुंबई उपाध्यक्ष), सीमाताई कांबळे (नवी मुंबई उपाध्यक्ष), नयनाताई सुरवाडे (अंबरनाथ तालुकाध्यक्ष), इत्यादी कार्यकर्ते पदाधीकारी यांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहून साहेबांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# आवकाळी पावसामुळे भू सपाट झालले पीकांचे पंचनामे करुन मदत करावी

निलंगा :– शेतकरी यांचे वादळी वाऱ्यामुळे व आवकाळी पावसामुळे भू सपाट झालले ऊस व रबीचे पीकांचे पंचनामे करुन मदत करावी तहसीलदारांना निवेदनाद्वारे मागणी.



२८/११/२०२३ रोजीच्या वादळी वाऱ्याहीत आवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे आतोनात नुकसान झाले असून तात्काळ प्रशासनाने पंचनामे करावे व रबी पिकांचे पंचनामे करुन तात्काळ नुकसान भरवाईची घोषणा करण्यात यावे. निलंगा तालुक्यात प्रामुख्याने या वादळी वाऱ्यांचा व पावसाचा फटका बसला असून हाता तोंडाला आल्याले पिक भु सफाट झाले आहेत. निदूर महसुल व पानचिंचोली मंडळातील मसलगा, केळगाव, बसपुर, मुगाय, ताजपुर, अंबेगाव, शेंद, काटेजवळगाव, राठोडा, माचरटवाडी, खडकउमरगा, कलांडी गौर, संपूर्ण मंडळात या पावसामुळे ऊस, ज्वारी, तुर, हे पिके भु सपाट झाले असून अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील माती ही वाहून गेली आहे. काल पासुन शेतकऱ्यांच्या बांधावर महसुल प्रशासनाचा व कृषी विभागाचा कुठलाही आधिकारी शेतकऱ्यांच्या नुकसानीची पहाणी करण्यासाठी फिरकलाही नाही. वरील निवेदन दिनांक: २८/११/२०२३ रोजी दिलेले आहे. आज रोजी कसल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. व जाय मोक्यावरती व बांधावरती एकही कृषी विभागातील कोणताही अधिकारी ३ च महसुल विभागातील कोणताही अधिकारी पिक पाहणी करण्यासाठी शेतात आलेला नाही. म्हणुन या पिक नुकसानी संदर्भात येत्या दिनांक :– २०/१२/२०२३ रोजी आपल्या कार्यालयासमोर चुल मांडु अंदोलन करण्यात येणार आहे. याची तिवृ नोंद घेण्यात यावे. व होणाऱ्या सर्व प्रकारास प्रशासन – जबाबदार राहील याची नोंद घेण्यात यावी. याची दखल घेऊन या गावातील पिकाचे प्रामुख्या पंचनामे करुन रबी पिकाला अनुदान द्यावे. तर आडवे पडलेले ऊस तात्काळ कारखाण्याला पोच करुन शेतकऱ्यांचे आर्थीक संकटातुन शेतकऱ्यांना बाहेर काडावे. अनेथा या मंडळातील सर्व शेतकरी भांधव चुल मांडुन ठिया आदलोन करण्यात येईल. असा इशारा दास भैय्या साळुंके, ज्ञानेश्वर शेषेराव पिंड, माधवराव बालाजीराव माहिते यांनी निवेदनाद्वारे तहसीलदारांना दिले आहे.

# न.मु. महानगरपालिका परिवहन विभाग तर्फे जेष्ठ नागरिकांना बस प्रवास मोफत



नवी मुंबई / के. एच. हनवते :– नवीं मुंबई महानगरपालिका आयुक्त : श्री राजेश नार्वे कर यांनी नवी मुंबई परिवहन विभाग बस मधून या पुढे जेष्ठ नागरिकांना बस प्रवास मोफत केल्याबद्दल सिवुडस अक्षर कट्टा आम्ही नवी मुंबईकर यांच्या वतीने आयुक्त राजेश नार्वेकर यांची सदिच्छा भेट घेतली व त्यांचे जाहीर अभार व्यक्त केले. त्यावेळी सिवुडस अक्षर कट्टा सभासद सुरेश पोटे (सचिव फेस्कॉम मुंबई), व नवीं मुंबई प्रादेशिक विभाग डॉ संतोष कुसरे, श्री आप्पा कुळकर्णी, श्री अरविंद जयकर, श्री मुकुंद पवार, श्री बसप्पा कलोली, श्री सुरेश पोटे यांनी आम्ही नवी मुंबईकर जेष्ठ नागरिकाच्या वतीने आयुक्त श्री राजेश नार्वे कर यांना शाल व पुष्पगुच्छ आणि फेस्कॉमची प्रार्थना असलेली फोटो फ्रेम भेट दिली. व नवी मुंबई आयुक्तांचे जेष्ठ नागरिकांच्या वतीने हार्दिक आभार मानले. व आयुक्तांनी जेष्ठ नागरिकांना स

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश १६ डिसेंबर, २०२३ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ३१ डिसेंबर, २०२३ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# अंगद वाघमारे यांची मुख्यमंत्र्यांसोबत बैठक; तुर्तास उपोषण मागे



लातूर: मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे लहुजी सेना संस्थापक अध्यक्ष अंगद वाघमारे गेली आठ दिवसापासून बेमुदत आमरण उपोषण करत होते.पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या लेखी आश्वासनानंतर मुख्यमंत्री महोदय यांच्या समवेत लवकरच बैठक लावू,असे पत्र दिल्यामुळे अमरन उपोषण तूर्तास मागे घेण्यात आले आहे. या आमरण उपोषण दरम्यान अंगद वाघमारे यांची तब्येत खूप खालावली होती. ही बातमी वाऱ्यासारखी जिल्हा व राज्यभर पसरल्याने त्यांच्या आमरण उपोषणास पाठिंबा देण्यासाठी विविध सामाजिक संघटना,समाज बांधव व वेगवेगळ्या पक्षाच्या वतीने नेते, पदाधिकारी भेट देत होती. राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी नागपूर येथे चालू असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये वाघमारे यांचे उपोषण सोडण्यासाठी सरकारने व पालकमंत्री म्हणून गिरीश महाजन यांनी लक्ष घालावे म्हणून त्या ठिकाणी प्रश्न मांडला असता गिरीश महाजन यांनी अंगद वाघमारे यांना लेखी पत्र देऊन तूर्तास आमरण उपोषण मागे घ्यावे मी, मुख्यमंत्री आणि स्थानिक आमदार अमित देशमुख तसेच आपले शिस्तमंडळ यांची लवकरच मंत्रालय मुंबई येथे आपल्या मागण्याबाबत बैठक लावतो, असे आशयाचे पत्र जिल्हा अधिकारी मार्फत निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांच्याकडे पाठवले व ढगे यांनी उपोषणस्थळी जाऊन ते पत्र अंगद वाघमारे यांना दिले व त्यांना ज्यूस पाजवून तूर्तास उपोषण मागे घेण्याची विनंती केली यावरून वाघमारे यांनी आपले अमरण उपोषण मागे घेतले.यावेळी मोठ्या संख्येने मातंग समाजाचा जनसमुदाय उपस्थित होता.

# रामेश्वर येथील श्री संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याच्या शेड उभारणीचा शुभारंभ





लातूर दि.१५ – ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी लातूर तालुक्यातील मौजे कासार जवळा रामेश्वर परिसरात उभारण्यात येत असलेल्या श्री संत गोपाळबुवा महाराज शुगर अँड ॲग्रो फूड इंडस्ट्रीज या साखर कारखान्याच्या शेड उभारणीचा शुभारंभ गुरुवार १४ डिसेंबर रोजी विधिवत पूजन करून करण्यात आला यावेळी कारखाना परिसरातील ऊस उत्पादकासह शेतकरी हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर तालुक्यातील लातूर – कळंब रोडवरील कासार जवळा – दिंडेगाव रस्त्यावर कासार जवळा रामेश्वर परिसरात श्री संत गोपाळबुवा महाराज शुगर अँड ॲग्रो फूड इंडस्ट्रीज या साखर कारखान्याची उभारणी गेल्या काही दिवसापासून युद्धपातळीवर सुरू आहे. या कारखान्याच्या शेड उभारणीचा शुभारंभ कारखान्याचे चेअरमन तुळशीरामअण्णा कराड, व्हाईस चेअरमन राजेश कराड यांच्यासह काशीरामनाना कराड, अनिल कराड, भाजपाचे ऋषिकेश कराड, अनिल भिसे, नवनाथ भोसले, डॉ. बाबासाहेब घुले, ॲड. दशरथ सरवदे, बन्सी भिसे, सतिश आंबेकर, वसंत करमुडे, अनंत चव्हाण, गोविंद नरहरे, गोपाळ पाटील यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. शेड उभारणी कार्यक्रमात उपस्थित ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्याच्या शेअर्सची रक्कम दोन टप्प्यात घेण्याची मागणी केली असता चेअरमन तुळशीरामअण्णा कराड आणि व्हाईस चेअरमन राजेश कराड यांनी सदरील मागणी मान्य केली. शेअर्स रक्कम २५ हजार रुपये असून त्यापैकी पहिल्या टप्प्यात १० हजार रुपये जमा करावेत उर्वरित १५ हजार रुपये शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून कपात केली जाईल असे सांगून यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना राजेश कराड यांनी १५ हजार रुपये इतर कारखान्याप्रमाणे कर्ज असणार नाही अथवा त्यावर कुठलीही व्याजाची आकारणी केली जाणार नाही अशी माहिती दिली.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार शेअरची रक्कम दोन टप्प्यात घेतली जाणार असून गरजवंत शेतकऱ्यांनी पंधरा दिवसात दहा हजाराचा पहिला टप्पा देऊन सातबारा, स्टॅम्प पेपर, आधार कार्ड, फोटो जमा करून शेअर्स नोंदणी करावी असे आवाहन याप्रसंगी व्हाईस चेअरमन राजेश कराड यांनी केले.

शेड उभारणी कार्यक्रमास भैरवनाथ पिसाळ, सुधाकर गवळी, विश्वास कावळे, राजकिरण साठे, रमाकांत फुलारी, शाम वाघमारे, काशिनाथ ढगे, ज्ञानेश्वर जुगल, पद्माकर होळकर, आदिनाथ मुळे, नाथराव कराड, रशीद पठाण, भरत कराड, बालाजी गवळी, प्रशांत शिंदे, अल्ताफ शेख, विकास सरवदे यांच्यासह कारखाना परिसरातील शेतकरी ऊस उत्पादक हितचिंतक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमोलशी बोलणे करून द्या अन्यथा आत्महत्या

लातूर : प्रतिनिधी अमोलने जे काही केले ते बेरोजगारीच्या कारणामुळे केले, त्याने सैन्य भरतीचे ६ वेळा प्रयत्न केले आणि त्याने रनिंगची चॅम्पियनशिपही जिंकली, अशी माहिती अमोल शिंदेच्या पालकांनी दिली. अमोलशी आमचे बोलणे करून द्या अन्यथा आत्महत्या करू, असा इशाराही त्यांनी एका खाजगी वृत्तवाहिनीशी बोलताना दिला.



गुणवत्ता असून मुलास नोकरी मिळाली नाही. रोजगार करणा–या लोकांच्या मुलास नोकरी लागत नाही का, असा प्रश्न धनराज शिंदे यांनी उपस्थित केला. मुलाशी बोलणे नाही झाल्यास मी आत्महत्या करणार, अशी भूमिकाही त्यांनी घेतली. बुधवारी संसदेची सुरक्षा भेदून चार युवक आतमध्ये गेले. त्यातील दोघांनी लोकसभेमध्ये जाऊन धूर सोडला. दोन तरुणांनी संसद परिसरात धुमाकूळ घातला. त्यानंतर या चौघांना पोलिसांनी अटक केली असून त्यांच्यावर यूएपीए अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यातील एक आरोपी अमोल शिंदे हा लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातल्या झरीचा रहिवासी आहे.अमोलने दिल्लीला जाण्याआधी विहीर खोदण्याचे काम केले. त्यातून पाच हजार मजुरी मिळवली. दोन हजार उसणे घेतले आणि ते घेवून तो ९ तारखेला दिल्लीसाठी निघाला होता. दोन दिवस मजूर म्हणून काम करून लातूरला गेला. तिथे जाऊन भगतसिंह यांचा फोटो विकत घेतला होता. भगतसिंह आणि इतरांचे फोटो असलेला बनियन विकत घेतला. तेच घालून तो संसदेत गेला होता. अमोलने अनेक ठिकाणी भरतीसाठी प्रयत्न केले. तो फक्त पोलिस आणि मिल्ट्री भरतीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काम करत होता.

# मोबाईल चोरीचे गुन्हे करणाऱ्या टोळीला चोरीच्या ३४ मोबाईलसह मुद्देमालासह पाच आरोपींना अटक.

लातूर–पोलीस ठाणे गांधीचौक हद्दी मधून मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली होती. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गांधी चौक गु.र.नं ६०६/२०२३ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. तसेच इतर पोलीस स्टेशनला देखील मोबाईल चोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले होते.

सदरचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आदेशित केले होते. त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या होत्या. सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेण्यात येत होते.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून मोबाईल चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली. सदर माहितीची बारकाईने अभ्यास व विश्लेषण करून मोबाईल चोरी करणारे व ते मोबाईल कमी किमतीत लोकांना विकणाऱ्या आरोपींची टोळी निष्पन्न करून टोळी टोळीतील सदस्यांना त्यांच्या राहते ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले आहे.सदर पथकांनी अतिशय कुशलतेने व उत्कृष्टपणे नमूद गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन आरोपी नामे आसिफ सत्तार सय्यद वय ,२४ वर्ष, जब्बार सत्तार सय्यद, वय २८ वर्ष, बाबा सतार सय्यद, वय २१ वर्ष, सर्व राहणार लालबहादूर शास्त्री नगर लातूर, मुस्तफा सतारमिया शेख, व २९ वर्ष, राहणार बरकत नगर लातूर सध्या राहणार करीमनगर, गरुड चौक लातूर,

मोहम्मद रिजवानुल हक अब्दुल रजाक गवंडी, वय ३० वर्ष,



राहणार दत्तनगर निलंगा.

यांना दिनांक १४/१२/२०२३ रोजी आरोपींना त्यांचे राहते ठिकाणाहून ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबुल केले.त्यांनी वर नमुद गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल विविध कंपनीचे ३४ मोबाईल एकूण ४ लाख २१ हजार रुपयाचा मुद्देमाल हजर केल्याने वरील आरोपींना वर नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. विवेकानंद पोलीस ठाण्याचा मोबाईल चोरीचा एक गुन्हा उघड झाला असून मोबाईल चोरीचे आणखीन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे गांधी चौक करीत आहेत.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस पथकांनी अतिशय उत्कृष्टरित्या तपास करून मोबाईल चोरणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अमलदार राहुल सोनकांबळे राजेश कंचे, मोहन सुरवसे, नितीन कठारे, राहुल कांबळे, मनोज खोसे प्रदीप चोपणे, सायबर सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती नलिनी गावडे पोलीस अमलदार संतोष देवडे, शैलेश सुडे यांनी केली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE